Date: 07th September, 2026

National Stock Exchange of India Ltd,
Exchange Plaza, 5th Floor,
Plot No. C/1, G Block,
Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400 051

BSE Ltd,
Department of Corporate Services
P. J. Towers, Dalal Street,
Mumbai - 400 001

Scrip Name: Inventure

Scrip Code: 533506

Sub.: Newspaper Advertisement regarding 31st Annual General Meeting ("the AGM") to be held on Tuesday, September 29, 2026 at 11:30 a.m. through Video Conferencing ("VC") / Other Audio Visual Means ("OAVM").

Dear Sir/Madam,

Pursuant to the provisions of Regulation 30 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and in compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules framed thereunder read with the relevant Circulars, please find enclosed copies of Newspaper Advertisement published in "Financial Express", "Free Press Journal" and "Navshakti" on 07th September, 2026 with respect to the ensuing AGM of the Company.

The copies of Advertisement are also available on website of the Company at www.inventuregrowth.com.

Kindly take the same on record.

Thanking you,

For Inventure Growth & Securities Ltd

KAMLESH S
LIMBACHIYA

Digitally signed by KAMLESH S LIMBACHIYA
DN: c=IN, postalCode=400063, st=MAHARASHTRA, street=A2702, OBEROI WOODS ,MOHAN GOKHALE ROAD ,MUMBAI,GOREGAON (EAST) ,400063, l=MUMBAI, o=Personal, serialNumber=576ab5ed7462c6b0aa80e6bdcd08056d5f369568d81e8efa61d86642cd1ba493, pseudonym=4a43c3b7e3374472a5dde3f37c2e4327, 2.5.4.20=d6ae4d7bd9abaa19e9930fef0286c57b32315e4e0cbbbb09d650aae74430e183, email=KAMLESH.LIMBACHIYA@INVENTUREGROWTH.COM, cn=KAMLESH S LIMBACHIYA
Date: 2026.09.07 12:22:54 +05'30'

Mr. Kamlesh S. Limbachiya
Whole Time Director
DIN: 02774663

अभिनव कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड

सीआयएन: एल६५९९०एमएच१९९४पीएलसी०८३६०३
नों. कार्यालय: बी ७०९ एक्सप्रेस झोन, वे. एक्सप्रेस हायवे, साऊथ साईड, अदानी इलेक्ट्रिसिटी समोर, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७,
टेली. ०२२–२८४२५९०७
ईमेल आयडी : info@abhinavcapital.com वेबसाईट : www.abhinavcapital.com

वार्षिक सर्वसाधारण सभा, ई–मतदानाची माहिती आणि बूक क्लोजरची सूचना

३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेकरिता सूचना :

- सूचना याद्वारे देण्यात येते की, **अभिनव कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड ('कंपनी')** च्या सभासदांची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ही, एमजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज करण्यासाठी कंपनी अधिनियम, २०१३, त्या अंतर्गत केलेले नियम सहवाचता निगम व्यवहार मंत्रालय (''एमसीए'') द्वारे जारी लागू सर्क्युलर्स आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ (''सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स'') च्या लागू तरतुदींच्या लागू तरतुदींनुसार बुधवार, ३० सप्टेंबर, २०२६ रोजी स. ११.०० वा. व्हिडियो कॉन्फरन्सिंग (अदर ऑडिओ व्हिजुअल मिन्स (ओएव्हिएम)) मार्फत घेण्या येणार आहे.
- आर्थिक वर्ष २०२५–२६ करिता कंपनीचा वार्षिक अहवाल आणि एजीएमच्या सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक/प्रती सर्व सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडी वर पाठविण्यात आलेले आहे. एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५–२६ साठीचा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईट www.abhinavcapital.com आणि बीएसई आणि सीडीएसएलच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.
- २३ सप्टेंबर २०२६ रोजीच्या कट–ऑफ तारखेला प्रत्यक्ष स्वरूपातील किंवा डिमटेरियलाज्ड स्वरूपातील शेअरधारक सभासद हे इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली माध्यमाने एजीएम सूचनेमध्ये दिल्याप्रमाणे सामान्य आणि विशेष कामकाजा करिता आपले मत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदवू शकतात. डिमटेरियलाइज्ड माध्यमाने, प्रत्यक्ष स्वरूपातील शेअरधारक सदस्य आणि ज्यांनी कंपनीकडे आपले इमेल नोंदविलेले नाहीत, अशा दूरस्थ मतदान करणारे शेअरधारकांसाठी मतदान पद्धत एजीएम सूचनेमध्ये दिलेली आहे. सूचना कंपनीच्या वेबसाईट वर उपलब्ध आहे.
- इलेक्ट्रानिक पद्धतीने मतदान २७ सप्टेंबर २०२६ (स. ९.०० वा.) (भाप्रवे) सुरू होईल आणि २९ सप्टेंबर २०२६ (सायं. ५.०० वा.) (भाप्रवे) संपेल.
- कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ९१ आणि त्यातील लागू नियम आणि (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर च्या रेग्युलेशन ४२ ला अनुसरुन कंपनीच्या समभागाकरिता सभासद रजिस्टर आणि शेअर हस्तांतर पुस्तके २४ सप्टेंबर २०२६ पासून ३० सप्टेंबर २०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील.

अभिनव कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड करिता
स्वाक्षरी/–
चेतन कारिया
अध्यक्ष
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०५ सप्टेंबर, २०२६
डीआयएन०००१५११३

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client, Mr. Kirit Chandulal Abhani, was a partner of M/s. Alpana Builders, a partnership firm having its office at 202, Neel Kanth Niketan, Karani Lane, Ghatkopar West, Mumbai-400086, carrying on the business of property development and allied activities.

My client has retired from the said Firm with effect from 15th August, 2026, as per Paragraph No.18 of the Partnership Deed dated 9th July, 2015. In view of his retirement, my client shall not deal in the name of or on behalf of the said Firm.

The continuing partners of the Firm are (1) Hansaben Harshadbhai Shah (2) Ashaben Dineshbhai Shah and (3) Bhartiben Girishbhai Jariwala.

My client shall not be responsible or liable for any act, deed, transaction, commitment or liability of the said Firm after the date of his retirement.

This public notice is issued pursuant to section 32 (3) of the Indian Partnership Act, 1932. All persons are hereby called upon to take notice of my client's retirement.

Date : September, 2026.
Place : Mumbai

Sd/-
Rehan Khan, Advocate
Address : Kothari House, 3rd Floor, Office No. 2, A.R. Allana Marg, Fort, Mumbai-400001

जाहीर नोटीस

ॲड. डी. डी. आजगेकर
कारणे दाखवा नोटीस
(सर्वसाधारण नमूना) नमुना ४ अनुसूची १, परिशिष्ट एच.
दिवाणी अ ९ म.
निशाणी क्रमांक ११ / डी

आजरा येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर आजरा यांच्या न्यायालयातील नियमित दरखास्त नं. १० / २०२४

१. जान्हवी इंडस्टीज पेद्रेवाडी, ता. आजरा जि. कोल्हापूर तर्फे मालक
सौ. स्वाती समीर चव्हाण
रा. पेद्रवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर **... अर्जदार**

विरूध्द

१. माधुरी मधुसूदन कोरगांवकर
रा. खोली नं. २, हनुमान टेकडी गोळीबार रोड, सांताक्रुझ पूर्व मुंबई नं. ५५ **... वि. प.**

ज्याअर्थी उपरिनमित दरखास्तदार जान्हवी इंडस्टीज पेद्रेवाडी, ता. आजरा जि. कोल्हापूर तर्फे मालक सौ. स्वाती समीर चव्हाण यांनी या न्यायालयाकडे रक्कम रु.४,२०,०००/- व्याजासह मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, याव्दारे तुम्हाला फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरूध्द कारण दाखवण्याकरिता दिनांक ०८/१०/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होउन निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापुर्वी बजावणीकरिता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक ३१ माहे ऑगस्ट, सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

सहा. अधीक्षक,
दिवाणी न्यायालय व स्तर,.
आजरा

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील **बर्गेस सॅम कूपर आणि दिलखुश बर्गेस कूपर** हे **हुफ्रिझ आदी सूनावाला** यांच्यासोबत खालील परिशिष्ट मिळकत खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत.

परिशिष्ट मिळकतीच्या संदर्भात, तिच्याविरुद्ध किंवा तिच्यावर विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, गहाण, भार, धारणाधिकार, बक्षीस, विश्वस्त व्यवस्था, देखभाल, उत्तराधिकार, कब्जा, भाडेपट्टा, लिव्ह अँड लायसन्स, सुखभोगाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणत्याही व्यक्तीचा कोणताही वाद, दावा, हरकत इत्यादी असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनापासून १० दिवसांच्या कालावधीत, त्याच्या समर्थनार्थ; कागदोपत्री पुराव्यासह, अधोहस्ताक्षरींना लेखी स्वरूपात कळवावे; असे करण्यात कसूर केल्यास, अशा व्यक्तींच्या अशा रकमा किंवा दावे, असल्यास, त्याग केलेले आणि/किंवा सोडून दिलेले मानले जातील आणि त्यानंतर माझे अशील सदर शेअर्स आणि सदर प्रिमायसेस खरेदी करण्यास मोकळे राहतील.

उपरोक्त संदर्भित परिशिष्ट:

एन.ए.प्लॉट क्र. ३५ (पूर्वी प्लॉट क्र. ५४ म्हणून ओळखला जाणारा), क्षेत्र मोजमापीत अंदाजे ५७२६ चौ. फूट म्हणजेच ५३२ चौरस मीटर्स, नवीन सर्व्हे क्र. ६० आणि जुना सर्व्हे क्र. २० (भाग), २३ (भाग), ४४ (भाग), ४७ (भाग) धारण करणारा, गाव कोडिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, ग्रामपंचायत दानिवली तर्फे वारडी, दुय्यम निबंधक, कर्जत, जिल्हा रायगड येथे स्थित, १४.८१.५० हेक्टर क्षेत्र मोजमापीत असलेल्या मोठ्या जमिनीच्या प्लॉटवर, केकी बाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पामधील अकृषिक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:

पूर्वेस : प्लॉट क्र. ३३ दक्षिणेस : ६ मी. रस्ता पश्चिमेस : १८ मी. रस्ता उत्तरेस : प्लॉट क्र. ३४ त्यास संलग्न सर्व हक्क, सुखभोगाधिकार, अनुषंगिक बाबी आणि लाभांसह.

दिनांक ०७ सप्टेंबर, २०२६.

सही/–
श्रीमती ग्रिश्मा लाड
वकिल उच्च न्यायालय,
प्लॉट क्र. ७२, लाड मॅन्शन, तिसरा मजला, भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई – ४०००१९
मोबाईल : ९००४०७७७८०

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public that my client, **RAJESH RAYON SILK MILLS LTD**, having address at 307/309, Kalbadevi Road, Mumbai 400002 (hereinafter referred to as the "Intending Purchaser"), is negotiating to purchase and acquire the property more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the "said Property"), from Mr. **MUKESH J. PATEL** and others, having address at 602 Vishal Apartment I/Wing, M.V. Road, Near Vishal Hall, Andheri East, Mumbai (hereinafter collectively referred to as the "Vendors/Owners"), who claim to be the absolute owners of and well and sufficiently entitled to the said Property, free from all encumbrances, charges, liens, claims, liabilities, and reasonable doubts whatsoever.

Any person(s) having any right, title, interest, claim, or demand of whatsoever nature in or against the said Property, or any part thereof, whether by way of sale, exchange, gift, mortgage, charge, lien, lease, leave and licence, tenancy, inheritance, possession, easement, maintenance, or otherwise howsoever, is/are hereby required to make the same known in writing, together with supporting documentary evidence in respect thereof, to the undersigned at the address mentioned below, within **FOURTEEN (14) DAYS** from the date of publication of this notice.

If no such claim, objection, or demand is received within the said period, it shall be presumed that there is no claim, right, title, or interest outstanding against the said Property, and that the same is free from all encumbrances whatsoever, and my client, **RAJESH RAYON SILK MILLS LTD**, shall proceed to complete the purchase of the said Property from the said Vendors / Owners, treating the title of the said Vendors / Owners thereto as clear, marketable, & free from all encumbrances. Any claim received thereafter, or not received at all, shall be deemed to have been waived and shall not be binding on my client or the said Property.

THE SCHEDULE OF PROPERTY ABOVE REFERRED TO

All that piece and parcel of the building No. 159/16, constructed on the land bearing City Survey No. 761 lying, being, and situated at Cavel Cross Lane No. 6, Dr. Vegas Street, Mumbai 400002, and bounded as follows:

On or towards the North by: Gali
On or towards the South by: Dhabolkar Wadi
On or towards the East by: 157/5 Ganesh Krupa Society
On or towards the West by: 159/15, Mohd Firoj Munsif Khan Building

Date: 07.09.2026
Place: Mumbai

sd/-
E² Conseiller
Adv. High Court Mumbai
Office Address: 160, Old Esplanade School Building, D.N. Road, Fort, Mumbai – 400 001.
Contact No. 9022666304

एसपीडी कोल्ड स्टोरेज एलएलपी – परिसमापनामध्ये

एलएलपी–आयएन : एएएम–४१७९
नोंदणीकृत पत्ता : न्यू प्लॉट क्र. ३०५, गेट क्र. २, ई वॉर्ड, गाडी अड्डा, शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत, ४१६००५.

ई–लिलाव सूचना

नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ सहवाचता इन्सॉल्वन्सी अँण्ड बँकृप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ अन्वये कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तांच्या विक्रीबाबत

(याद्वारे सूचना देण्यात येते की, कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्ता अलिप्त आधारावर ई–लिलावाद्वारे विक्रीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील.)

ई–लिलावाची तारीख व वेळ : अलिप्त आधारावर– १८ सप्टेंबर, २०२६ रोजी स. ११:०० ते दु. ०२:०० वा. पर्यंत (प्रत्येक वेळी १० मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह)

ई–लिलाव प्लॅटफॉर्म https://baanknet.com/ (बँक ॲसेट ऑक्शन नेटवर्क)

(सर्व आकडेवारी भारुत)

ब्लॉक	मत्तेचा तपशील	लिलाव आयडी	राखीव किंमत	इसारा अनामत रक्कम	बोली वाढ रक्कम
१.	शाहू मार्केट यार्ड, ई–वॉर्ड, कोल्हापूर, ४१६००५ येथे स्थित सी एस क्र. ४३३ पैकी खुला प्लॉट क्र. सी एस १, मोजमापित १५८० चौ. मी.	४७८२	रु. १,७९,८०,०००/–	रु. १७,९८,०००/–	रु. २,००,०००/–

पात्रता दस्तावेज सादर करण्याची अंतिम तारीख	**१६ सप्टेंबर, २०२६, ई–लिलाव तपशीलवार प्रक्रिया दस्तावेजात नमूद केलेल्या पध्दतीत**
कॉर्पोरेट कर्जदाराच्या मत्तेचे निरिक्षण	**०७ सप्टेंबर, २०२६, पासून २० जुलै, २०२६ पर्यंत**
इसारा अनामत रक्कम सादर करण्याची अंतिम तारीख	**१६ सप्टेंबर, २०२६,**
पात्र बोलीदारांकरिता ई–लिलावाची तारीख आणि वेळ	**१८ सप्टेंबर, २०२६,, स. ११.०० ते दु. ०२.००**

विक्रीच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

१. ई–लिलाव हा मंजूर सेवा प्रदाता बँक ॲसेट ऑक्शन नेटवर्क मार्फत **''जे आहे जसे आहे'', ''जे आहे ते आहे'', ''जे काही आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय''** या तत्त्वावर आयोजित केला जाईल. सदर विक्री कोणत्याही प्रकारच्या हमी किंवा भरपाईशिवाय असेल.
२. मालमत्तांची विक्री अलिप्त आधारावर केली जाईल.
३. सर्व इच्छुक बोलीदारांनी ई–लिलावात सहभागी होण्यापूर्वी सविस्तर ई–लिलाव प्रक्रिया माहितीपत्रक काळजीपूर्वक तपासावे आणि मालमत्तेबाबत स्वतःची स्वतंत्र पडताळणी करावी. विक्री **''जे आहे जसे आहे'', ''जे आहे ते आहे'', ''जे काही आहे'' आणि ''कोणत्याही आधाराशिवाय''** या तत्त्वावर केली जाईल.
४. कागदपत्रे **https://baanknet.com/ या संकेतस्थळावर ०७ सप्टेंबर, २०२६, रोजी किंवा त्यापूर्वी** सादर करावीत. संपूर्ण ई–लिलाव प्रक्रियेच्या सविस्तर अटी व शर्तीसह बोली अर्ज **https://baanknet.com/** या संकेतस्थळावरून डाउनलोड करता येईल.
५. संभाव्य बोलीदारांनी ईओआय सादर करताना, संहितेच्या कलम २९ए अंतर्गत लागू असलेल्या कोणत्याही अपात्रतेस ते बळी पडत नसल्याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच, ईओआय सादर केल्यानंतर अपात्र आढळल्यास इसारा अनामत रक्कम जप्त केली जाईल.
६. सर्वोच्च बोलीदार घोषित झाल्यानंतर तीन दिवसांच्या आत परिसमापक सर्वोच्च बोलीदाराची योग्य ती पडताळणी करून त्याची पात्रता सत्यापित करेल आणि त्याचा अहवाल कर्जदार समितीसमोर सादर करेल. कर्जदार समितीशी सल्लामसलत करून परिसमापक सर्वोच्च बोलीदाराला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करेल किंवा त्याची बोली नाकारू शकतो.
७. सर्वोच्च बोलीदार अपात्र आढळल्यास, परिसमापक कर्जदार समितीशी सल्लामसलत करून योग्य पडताळणी व सत्यापनानंतर पुढील सर्वोच्च बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करू शकतो.
८. हे स्पष्ट करण्यात येते की हे आमंत्रण संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करण्यासाठी असून, विक्री पूर्ण करण्यासाठी परिसमापक किंवा कंपनीवर कोणतेही बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. परिसमापकाला कोणतेही कारण न देता व कोणतीही जबाबदारी न स्वीकारता प्रक्रिया रद्द करण्याचा, बदल करण्याचा आणि/किंवा कोणत्याही इच्छुक पक्षास / संभाव्य गुंतवणूकदारास / बोलीदारास स्वीकारण्यास नकार देण्याचा अथवा अपात्र ठरविण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.
९. इसारा अनामत रक्कम जमा करण्यापूर्वी व प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी सर्व अटी व शर्तींचा सविस्तर ई–लिलाव प्रक्रिया माहितीपत्रकातून अनिवार्यपणे संदर्भ घ्यावा.
१०. बोलीदारांना लिलाव प्रक्रियेबाबत कोणतीही शंका असल्यास, ते **https://baanknet.com/** या संकेतस्थळावरील ऑक्शन गाईड फॉर बायर्स चा संदर्भ घेऊ शकतात. **अधिक माहितीसाठी बोलीदार +९१ ८२९१२ २०२२० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधू शकतात किंवा support.baanknet@psballiance.com येथे ई–मेल करू शकतात.**
११. कृपया वरील क्यूआर कोड स्कॅन करून प्रविष्ट करा व लिलावाचा तपशील पाहा.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती– ई–लिलाव प्रक्रिया दस्तावेजांचा संदर्भ घ्यावा.

दिनांक : ०७.०९.२०२६
ठिकाण : मुंबई

सही/–
बालाजी सुमंत चेमोटे
सॉल्व्हेन्झा ॲडव्हायझरी एलएलपीचे प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता
परिसमापक – एसपीडी कोल्ड स्टोरेज एलएलपी
आयबीबीआय नोंदणी क्र. : आयबीबीआय/आयपीई–०१४४/आयपीए–१/२०२२–२३/५०००८
ई–मेल आयडी : spdcoldstorage.cirp@gmail.com

Carrier For the World We Share

कॅरियर टेक्नॉलॉजीज इंडिया लिमिटेड

सीआयएन: यू२९१९३एमएच१९८१एफएलसी०२४३६४
नोंदणीकृत कार्यालय: युनिट क्र. ४बी, २रा मजला, द सेंट्रियम, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला पश्चिम, मुंबई – ४०००७०, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी: +९१–२२–६१७००७००, फॅक्स: +९१–१२४–४८२५३६१
वेबसाइट: https://www.carrier.com/commercial/en/in/
ईमेल: gpcpcsindialegal@carrier.com

४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (''एजीएम''), रिमोट ई–मतदान आणि एजीएमदरम्यान ई–मतदानाबाबत सूचना

प्रिय सदस्यांनो:

१. कॅरियर टेक्नॉलॉजीज इंडिया लिमिटेड **(''कंपनी'')** ची ४४ वी (चव्वेचाळीसावी) वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, २८ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग **(''व्हीसी'')** / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे **(''ओएव्हीएम'')**, कंपनीज ॲक्ट, २०१३ च्या लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम, २२ सप्टेंबर २०२५ दिनांकित जनरल सर्क्युलर क्र. ०३/२०२५ आणि/किंवा या संदर्भात लागू असलेले अन्य अधिसूचना/सर्क्युलर (एकत्रितपणे **''एमसीए सर्क्युलर्स''** म्हणून संदर्भित) यांच्या अनुपालनात, एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित केली जाईल. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सहभागी होणाऱ्या सदस्यांची गणना कंपनीज ॲक्ट, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरम निश्चित करण्याच्या उद्देशासाठी केली जाईल.
२. संबंधित सर्क्युलर्सच्या अनुपालनात, आर्थिक वर्ष २०२५–२०२६ साठी आर्थिक विवरणपत्रे आणि ३१ मार्च, २०२६ रोजी समाप्त झालेल्या वर्षासाठीचा वार्षिक अहवाल असलेली एजीएमची सूचना ५ सप्टेंबर, २०२६ रोजी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स) (डीपी) यांच्याकडे ईमेल पत्ते नोंदणीकृत असलेल्या कंपनीच्या सदस्यांना पाठविण्यात आली आहे. वरील दस्तऐवज कंपनीच्या www.carrier.com/building-solutions/en/in/investor/ वेबसाइटवर तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (''सीडीएसएल'') च्या www.evotingindia.com वेबसाइटवर देखील उपलब्ध असतील.

४४ व्या एजीएमपूर्वी आणि एजीएमदरम्यान रिमोट ई–मतदान/ई–मतदानासाठी सूचना:

३. कंपनी आपल्या सदस्यांना ४४ व्या एजीएममध्ये पारित करण्यासाठी प्रस्तावित सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे त्यांचे मत देण्याच्या हक्काचा वापर करण्याची सुविधा प्रदान करत आहे. सदस्य कंपनीने अवलंबिलेल्या सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे (''रिमोट ई–मतदान'') रिमोट पद्धतीने त्यांचे मत देऊ शकतात. पुढे, एजीएमदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदानाची (''ई–मतदान'') सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल आणि ज्या सदस्यांनी रिमोट ई–मतदानाद्वारे आपले मत दिलेले नाही, असे एजीएममध्ये उपस्थित राहणारे सदस्य ४४ व्या एजीएममध्ये ई–मतदानाद्वारे मतदान करू शकतील. कंपनीने ई–मतदानाची सुविधा प्रदान करण्यासाठी सीडीएसएलच्या सेवांचा एजन्सी म्हणून लाभ घेतला आहे.
४. ई–मतदानाशी संबंधित यूजर आयडी आणि पासवर्ड कसा तयार करावा याच्या तपशीलांसह माहिती आणि सूचना सदस्यांना ई–मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत. व्हीसी / ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहण्यासाठी त्याच लॉगिन क्रेडेन्शियल्सचा वापर करावा. डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य, फिजिकल स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य आणि ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत अशा सदस्यांसाठी ४४ व्या एजीएमदरम्यान रिमोट ई–मतदान आणि ई–मतदानाची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान करण्यात आली आहे आणि ती कंपनीच्या www.carrier.com/building-solutions/en/in/investor/ वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.
   i. रिमोट ई–मतदानाची सुविधा खालील मतदान कालावधीत उपलब्ध असेल:

रिमोट ई–मतदानाचा प्रारंभ	**शुक्रवार, २५ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता**
रिमोट ई–मतदानाची समाप्ती	**रविवार, २७ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता**

   ii. वरील तारीख आणि वेळेनंतर रिमोट ई–मतदानास परवानगी दिली जाणार नाही आणि वरील कालावधी समाप्त झाल्यानंतर सीडीएसएलद्वारे रिमोट ई–मतदान मॉड्यूल तत्काळ अक्षम केले जाईल.
   iii. कट–ऑफ तारीख म्हणजेच २१ सप्टेंबर, २०२६ रोजी सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीजकडे असलेल्या बेनिफिशियल ओनर्सच्या रजिस्टरमध्ये ज्यांचे नाव नोंदलेले असेल, अशाच व्यक्तींना ४४ व्या एजीएममध्ये रिमोट ई–मतदान किंवा ई–मतदानाची सुविधा घेण्याचा हक्क असेल.
५. लाभांश थेट बँक खात्यांमध्ये प्राप्त करण्याच्या उद्देशाने, सदस्यांना त्यांच्या बँक खात्यांचा तपशील म्हणजेच बँकेचे नाव आणि शाखा, बँक खाते क्रमांक आणि खाते प्रकार तसेच इतर कोअर बँकिंग तपशील जसे की एमआयसीआर (मॅग्नेटिक इंक कॅरेक्टर रिकग्निशन), आयएफएससी (इंडियन फायनान्शियल सिस्टम कोड) इत्यादी तपशील लवकरात लवकर त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे अद्ययावत/नोंदणीकृत करण्याची विनंती करण्यात येते. इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील शेअर्सच्या बाबतीत रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट ऑफ द कंपनी यांच्याकडे आणि कंपनीच्या बँकर्सकडे असलेली नोंदणी, लाभांश वॉरंट/चेकद्वारे लाभांश देयक पाठविण्यासाठी वापरली जाईल. अशी सुविधा उपलब्ध नसल्यास किंवा सदस्यांच्या बँक खाते तपशीलांचे अद्ययावतीकरण न झाल्यास, कंपनी सदस्यांकडे उपलब्ध असलेल्या तपशीलांच्या आधारे लाभांश वॉरंट/चेक पाठवून अशा सदस्यांना लाभांशाचे प्रदान सुनिश्चित करेल.

ईमेल पत्ते नोंदणीकृत/अद्ययावत करण्याची पद्धत खालीलप्रमाणे आहे:

६. फिजिकल स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य, ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनी आणि/किंवा रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट ऑफ कंपनी यांच्याकडे नोंदणीकृत/अद्ययावत केलेले नाहीत, ते ४४ व्या एजीएमची सूचना, वार्षिक अहवाल आणि ४४ व्या एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सहभागी होण्यासाठी आणि ई–मतदानासाठी लॉगिन तपशील प्राप्त करण्याकरिता, त्यांचा फोलिओ क्र. आणि पत्ता, पॅन कार्डची स्व–साक्षांकित प्रत आणि पत्त्याच्या पुराव्याची स्व–साक्षांकित प्रत उदा. आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, इलेक्शन आयडेंटिटी कार्ड, पासपोर्ट स्कॅन करून कंपनीच्या gpcpcsindialegal@carrier.com किंवा कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट यांच्या info@adroitcorporate.com ईमेलवर पाठवून त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत करू शकतात. डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य, ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स)कडे नोंदणीकृत/अद्ययावत केलेले नाहीत, त्यांनी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स)कडे त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत/अद्ययावत करण्याची विनंती करावी.
७. एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीची सदस्य होणारी आणि कट–ऑफ तारखेला शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती, कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केलेल्या पद्धतीने यूजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकते. असे सदस्य एजीएमच्या सूचनेमध्ये कंपनीने विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ई–मतदानाच्या सूचनांचा वापर करून त्यांचे मत देऊ शकतात. ज्या सदस्यांनी रिमोट ई–मतदानाद्वारे त्यांचे मत दिले आहे ते व्हीसी / ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना एजीएममध्ये पुन्हा त्यांचे मत देण्याचा हक्क राहणार नाही. सदस्याने एकदा मत दिल्यानंतर, त्याला/तिला त्यानंतर ते बदलण्याची किंवा पुन्हा मत देण्याची परवानगी दिली जाणार नाही. एजीएममध्ये उपस्थित राहणे, ई–मतदान यासंबंधी कोणतेही प्रश्न किंवा समस्या असल्यास, आपण www.evotingindia.com येथे हेल्प सेक्शन अंतर्गत उपलब्ध असलेल्या फ्रीक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (''एफएक्यूज'') आणि ई–मतदान मॅन्युअलचा संदर्भ घेऊ शकता किंवा श्री. संदीप शिंदे, मॅनेजर, अँड्रॉइट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, १८–२०, जाफरभोय इंड. इस्टेट, १ला मजला, मकवाना रोड, मरोळ नाका, अंधेरी (पू.), मुंबई – ४०००५९, महाराष्ट्र, भारत यांना लिहू शकता, ईमेल: info@adroitcorporate.com किंवा sandeeps@adroitcorporate.com (+९१–०२२–४२२७०४२३ / ४२२७०४००) किंवा gpcpcsindialegal@carrier.com येथे लिहू शकता किंवा श्री. नितीन कुमार (०२२–२३०८७८३) किंवा श्री. मेहबूब लखानी (०२२–२३०५८५४३) किंवा श्री. राकेश दळवी (०२२–२३०५८५४२) यांच्याशी संपर्क साधू शकता.

कॅरियर टेक्नॉलॉजीज इंडिया लिमिटेड करिता
सही/
समता जैन
कंपनी सेक्रेटरी
एम. क्र. ए४६१६२
ठिकाण: हैदराबाद
दिनांक: ०६.०९.२०२६

Marine Electricals

मरीन इलेक्ट्रिकल्स (इंडिया) लिमिटेड

(सीआयएन: एल३१९०७एमएच२००७पीएलसी१७६४४३)
नोंदणीकृत कार्यालय: बी/१, उद्योग सदन क्र. ३, एमआयडीसी, अंधेरी (पू.), मुंबई – ४०००९३, महाराष्ट्र **दूरध्वनी:** +९१ २२ ४०३३ ४३००; **फॅक्स:** +९१ २२ २८३६ ४०४५
वेबसाइट: www.marineelectricals.com; **ईमेल आयडी:** cs@marineelectricals.com

१९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची आणि ई–मतदान माहितीची सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, मरीन इलेक्ट्रिकल्स (इंडिया) लिमिटेड (''कंपनी'') च्या सदस्यांची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **बुधवार, सप्टेंबर ३०, २०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता भारतीय प्रमाणवेळेनुसार व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ–व्हिज्युअल माध्यमांद्वारे (व्हीसी)** घेण्यात येईल. निगम व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जारी केलेल्या जनरल सर्क्युलर क्रमांक १४/२०२०, १७/२०२० आणि नवीनतम ०३/२०२५ तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांनी जारी केलेल्या सर्क्युलर क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी/सीआयआर/पी/२०२०/२४२, सेबी / एचओ / सीएफडी / पीओडी–२ / पी / सीआयआर / २०२३ / ४ आणि सेबी / एचओ / सीएफडी / पीओडी–२ / पी / सीआयआर / २०२४ / १३ यांच्या अनुपालनात (यापुढे एकत्रितपणे 'सर्क्युलर्स' म्हणून संदर्भित), कंपन्यांना सदस्यांची प्रत्यक्ष उपस्थिती एका सामायिक ठिकाणी नसताना व्हीसीद्वारे एजीएम आयोजित करण्याची परवानगी आहे. कंपनीची एजीएम वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी व्हीसीद्वारे आयोजित केली जात आहे.

सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात. एजीएममध्ये सहभागी होण्यासाठीच्या सूचना आणि रिमोट इलेक्ट्रॉनिक मतदानामध्ये सहभागी होण्याची किंवा एजीएमदरम्यान ई–मतदान प्रणालीद्वारे मत देण्याची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान करण्यात आली आहे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सहभागी होणाऱ्या सदस्यांची गणना कंपनीज ॲक्ट, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरम निश्चित करण्याच्या उद्देशासाठी केली जाईल.

आर्थिक वर्ष २०२५–२६ साठीचा कंपनीचा वार्षिक अहवाल तसेच १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावणारी सूचना कंपनीच्या https://www.marineelectricals.com/annual-report.html वेबसाइटवर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि.च्या www.nseindia.com वेबसाइटवर तसेच ई–व्होटिंग प्लॅटफॉर्म पुरवठादाराच्या https://evoting.nsdl.com वेबसाइटवर उपलब्ध असेल.

१. **ईमेल पत्ते नोंदणीकृत करण्याची पद्धत:**
एमसीए सर्क्युलर्स आणि सेबी सर्क्युलर्सच्या अनुपालनात, ३१ मार्च, २०२६ रोजी समाप्त झालेल्या वर्षासाठीचा कंपनीचा वार्षिक अहवाल, ज्यामध्ये सदर वर्षाची आर्थिक विवरणपत्रे (''वार्षिक अहवाल'') समाविष्ट आहेत, तसेच एजीएमची सूचना, सर्क्युलर्सनुसार, ज्या सर्व सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे किंवा कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट अर्थात बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (''आरटीए'') यांच्याकडे किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपीज) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत, अशा सर्व सदस्यांना केवळ ईमेलद्वारे पाठविण्यात येईल. कंपनीचे भाग प्रत्यक्ष स्वरूपात धारण करणारे किंवा ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत केलेले नाहीत असे सदस्य investor@bigshareonline.com किंवा cs@marineelectricals.com येथे ईमेल पाठवून ते कंपनीकडे नोंदणीकृत करून घेऊ शकतात.

२. **ई–मतदानाद्वारे मत देण्याची पद्धत:**

रिमोट ई–मतदानाचा प्रारंभ	शनिवार, सप्टेंबर २६, २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजल्यापासून (भाप्रवे)
रिमोट ई–मतदानाची समाप्ती	मंगळवार, सप्टेंबर २९, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (भाप्रवे)

प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणारे किंवा ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत केलेले नाहीत असे सदस्य खालील प्रक्रियेचे पालन करून रिमोट ई–मतदानाद्वारे किंवा सभेदरम्यान नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे प्रदान केलेल्या ई–मतदान प्लॅटफॉर्मद्वारे त्यांचे मत देऊ शकतात:

ए) भाग प्रत्यक्ष स्वरूपात धारण केलेले असल्यास, कृपया फोलिओ क्र., भागधारकांचे नाव, शेअर सर्टिफिकेटची स्कॅन केलेली प्रत (पुढील आणि मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्व–साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्व–साक्षांकित स्कॅन केलेली प्रत) cs@marineelectricals.com येथे ईमेलद्वारे प्रदान करावी.
बी) भाग डिमॅट स्वरूपात धारण केलेले असल्यास, कृपया डीपीआयडी–सीएलआयडी (१६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी किंवा १६ अंकी बेनिफिशियरी आयडी), नाव, क्लायंट मास्टर किंवा कन्सॉलिडेटेड अकाउंट स्टेटमेंटची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्व–साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्व–साक्षांकित स्कॅन केलेली प्रत) cs@marineelectricals.com येथे प्रदान करावी. आपण डिमॅट स्वरूपात सिक्युरिटीज धारण करणारे वैयक्तिक भागधारक असल्यास, एजीएमच्या सूचनेमध्ये स्टेप १ (ए) मध्ये स्पष्ट केलेल्या लॉगिन पद्धतीचा म्हणजेच डिमॅट स्वरूपात सिक्युरिटीज धारण करणाऱ्या वैयक्तिक भागधारकासाठी ई–मतदान आणि व्हर्च्युअल सभेत सहभागी होण्यासाठीच्या लॉगिन पद्धतीचा संदर्भ घेण्याची विनंती करण्यात येते.
सी) पर्यायाने, सदस्य मुद्दा (१) किंवा (२) मध्ये नमूद केलेला तपशील, लागू असेल त्याप्रमाणे, प्रदान करून यूजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी evoting@nsdl.com येथे ईमेल विनंती पाठवू शकतात.
डी) ९ डिसेंबर, २०२० दिनांकित सेबी सर्क्युलरनुसार सूचीबद्ध कंपन्यांनी प्रदान केलेल्या ई–मतदान सुविधेसंदर्भात, डिमॅट स्वरूपात सिक्युरिटीज धारण करणाऱ्या वैयक्तिक भागधारकांना डिपॉझिटरीज आणि डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे ठेवलेल्या त्यांच्या डिमॅट खात्याद्वारे मतदान करण्याची परवानगी आहे. ई–मतदान सुविधेचा लाभ घेण्यासाठी शेअरहोल्डर्सनी त्यांच्या डिमॅट खात्यामध्ये त्यांचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी योग्यरीत्या अद्ययावत करणे आवश्यक आहे.

ई–मतदानाची प्रक्रिया आणि पद्धत (रिमोट ई–मतदान आणि एजीएमच्या वेळी मतदान या दोन्हींसाठी) तसेच व्हीसी किंवा ओएव्हीएमद्वारे १९ व्या एजीएममध्ये उपस्थित राहण्यासाठी, सदस्य एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सूचनांचे पालन करू शकतात किंवा एनएसडीएलच्या https://evoting.nsdl.com वेबसाइटला भेट देऊ शकतात आणि काही प्रश्न असल्यास evoting@nsdl.com येथे ईमेल करू शकतात.

मरीन इलेक्ट्रिकल्स (इंडिया) लिमिटेड करिता
सही/
दीप शाह
सचिव आणि अनुपालन अधिकारी
एसीएस:६१४८८
दिनांक: ५ सप्टेंबर, २०२६
ठिकाण: मुंबई

INVENTURE GROWTH & SECURITIES LTD.

इन्व्हेंचर ग्रोथ अँड सिक्युरिटीज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: विराज टॉवर, २ रा मजला, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, अंधेरी (पूर्व), मुंबई: ४०००६९; सीआयएन: एल६५९९०एमएच१९९५पीएलसी०८९८३८
ई-मेल: investorgrievances@inventuregrowth.com वेबसाइट: www.inventuregrowth.com
दूरध्वनी क्र. ९१-२२-७११४ ८५००, फॅक्स क्र. ९१-२२-७११४ ८५११

३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (''एजीएम'') सूचना, दूरस्थ ई–मतदान सुविधा आणि कट–ऑफ तारीख

याद्वारे सूचना देण्यात येते की, इन्व्हेंचर ग्रोथ अँड सिक्युरिटीज लिमिटेड (''कंपनी'') च्या भागधारकांची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, २९ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:३० वा. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/इतर ऑडिओ–व्हिज्युअल माध्यमांद्वारे (''ओएव्हीएम'') आयोजित करण्यात येईल, ज्यामध्ये ३१ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यात येईल.

मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (''एमसीए'') यांनी दिनांक ०८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ०५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१, ०८ डिसेंबर, २०२१, १४ डिसेंबर, २०२१, ०५ मे, २०२२, २८ डिसेंबर, २०२२, २९ सप्टेंबर, २०२३ आणि वेळोवेळी जारी केलेली इतर संबंधित परिपत्रके (एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रके'' म्हणून संबोधण्यात येणारी) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') यांनी दिनांक ०८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ०५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१, ०८ डिसेंबर, २०२१, १४ डिसेंबर, २०२१, ०५ मे, २०२२, २८ डिसेंबर, २०२२, २५ सप्टेंबर, २०२३, १९ सप्टेंबर, २०२४ आणि नवीनतम २२ सप्टेंबर, २०२५ रोजी जारी केलेली तसेच वेळोवेळी जारी केलेली इतर संबंधित परिपत्रके (एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रके'' म्हणून संबोधण्यात येणारी) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') यांनी दिनांक १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१, १३ मे, २०२२, ०५ जानेवारी, २०२३, ०७ ऑक्टोबर, २०२३ आणि नवीनतम दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ रोजी जारी केलेली परिपत्रके (एकत्रितपणे ''सेबी परिपत्रके'' म्हणून संबोधण्यात येणारी), एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रके (वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे) यांच्या अनुषंगाने सदर सभा आयोजित करण्यात येत आहे.

उपरोक्त परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांचे पालन करून, कंपनीने एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी वार्षिक अहवाल दिनांक ०३ सप्टेंबर, २०२६ रोजी ई–मेलद्वारे अशा सर्व भागधारकांना पाठविला आहे, ज्यांचे ई–मेल पत्ते दिनांक २८ ऑगस्ट, २०२६ रोजी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. भागधारकांनी नोंद घ्यावी की, एजीएमची सूचना, वार्षिक अहवाल, दूरस्थ ई–मतदानासाठी सूचना आणि व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभागी होण्याच्या सूचना कंपनीच्या www.inventuregrowth.com या वेबसाइटवर तसेच स्टॉक एक्स्चेंजच्या www.bseindia.com आणि www.nseindia.com या वेबसाइटवरही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ आणि इतर लागू तरतुदी, असल्यास, तसेच कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रूल्स, २०१४ मधील नियम २०, सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ मधील विनियम ४४, वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे, आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सेक्रेटरियल स्टँडर्ड ऑन जनरल मीटिंग्ज (''एसएस–२'') यानुसार, कंपनीला आपल्या सर्व सभासदांना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांनी उपलब्ध करून दिलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली प्लॅटफॉर्मद्वारे (दूरस्थ ई–मतदान) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्यासाठी दूरस्थ ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देताना आनंद होत आहे. सर्व सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की:

१. सभासदांची मतदानासाठी पात्रता निश्चित करण्याची कट–ऑफ तारीख २२ सप्टेंबर, २०२६ आहे;
२. कट–ऑफ तारखेला सभासद नोंदवही/लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये ज्यांची नावे नोंदविलेली आहेत, अशा व्यक्तींनाच दूरस्थ ई–मतदान सुविधा वापरून किंवा एजीएममध्ये मतदान करण्याचा अधिकार असेल;
३. एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स प्राप्त करून कंपनीचा सभासद झालेली आणि कट–ऑफ तारीख, २२ सप्टेंबर, २०२६ रोजी शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती enotices@in.mpms.mufg.com येथे विनंती पाठवून लॉग–इन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, असा भागधारक दूरस्थ ई–मतदानासाठी एलआयआयपीएलकडे आधीपासून नोंदणीकृत असल्यास, मतदान करण्यासाठी विद्यमान यूजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतो.
४. दूरस्थ ई–मतदान ५ दिवसांच्या कालावधीसाठी खुले राहील, जे २४ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०:०० वा. सुरू होऊन २८ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वा. समाप्त होईल (दोन्ही दिवस धरून);
५. दिनांक २८ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वा. नंतर ई–मतदानास परवानगी दिली जाणार नाही. एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) द्वारे दिनांक २८ सप्टेंबर, २०२६ रोजी भाप्रवे सायंकाळी ०५:०० वा. नंतर दूरस्थ ई–मतदान मॉड्यूल निष्क्रिय करण्यात येईल आणि सभासदाने ठरावावर एकदा मत दिल्यानंतर त्याला/तिला त्यामध्ये नंतर बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही;
६. केवळ असे सभासद/भागधारक, जे व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित असतील आणि ज्यांनी ठरावांवर दूरस्थ ई–मतदानाद्वारे मतदान केलेले नसेल, तेच एजीएममधील ई–मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.
७. एजीएमपूर्वी दूरस्थ ई–मतदानाद्वारे मतदान केलेले सभासद व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही;
८. कंपनीने ई–मतदान प्रक्रिया आणि एजीएममधील मतदानाची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी मुंबई येथील प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज श्री. धर्मेश झवेरी यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे;

सभासद व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला उपस्थित राहू शकतील किंवा एलआयआयपीएलद्वारे उपलब्ध करून दिलेल्या https://instameet.linkintime.co.in/ या वेबसाइटवर सभेचे थेट प्रक्षेपण पाहू शकतील.

सभासदांना दूरस्थ ई–मतदान/एजीएमदरम्यान ई–मतदानाबाबत कोणतेही प्रश्न असल्यास, ते enotices@in.mpms.mufg.com येथे पाठवू शकतात किंवा +९१ (०२२)४९१८६००० या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

इन्व्हेंचर ग्रोथ अँड सिक्युरिटीज लिमिटेडसाठी
सही/–
कांजी बचुभाई रिटा
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
स्थळ : मुंबई
दिनांक : ०७ सप्टेंबर, २०२६

OSBI State Bank of India

एसएआरबी ठाणे : ११६९७:– स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी शाखा, १ला मजला, केराम बिल्डिंग, प्लॉट क्र.ए–११२, सर्कल रोड क्र.२२, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम)–४००६०४. ईमेल: sbi.11697@sbi.co.in

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना जोडपत्र IV-A (नियम ८(६) चे परंतुके पहा)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण/भारित केलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष कब्जा सुरक्षित धनको स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला असून, **श्री. रमेश एन. अमाडोत आणि श्रीमती सोनल आर. अमाडोत** यांच्याकडून सुरक्षित धनकोस देय असलेल्या दिनांक **२०.०७.२०२१** रोजीच्या **रु. ९३,७४,६६९/– (रुपये त्र्याण्णव लाख चौऱ्याहत्तर हजार सहाशे एकोणसत्तर मात्र)** या रकमेच्या वसुलीसाठी, तसेच त्यावरील पुढील व्याज, आनुषंगिक खर्च आणि खर्चासह, सदर मालमत्ता दिनांक **२५.०९.२०२६** रोजी **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे तशी आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर विकण्यात येईल. राखीव किंमत **रु. ८७,३०,०००/– (रुपये सत्त्याऐंशी लाख तीस हजार मात्र)** असेल आणि इसारा ठेव रक्कम **रु. ८,७३,०००.०० (रुपये आठ लाख त्र्याहत्तर हजार मात्र)** असेल.

इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्याआधी लिलावात ठेवलेल्या मिळकतींवरील भार, त्यांचे मालकी हक्क आणि मिळकतीला बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/सोसायटी/ थकबाकीबाबत त्यांची स्वतंत्र चौकशी करून घ्यावी. ई–लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेकडून कोणतेही वचन किंवा कोणतेही सांगणे असल्याचा अर्थ काढू नये किंवा तसा समज करून घेऊ नये.

बोली लावणाऱ्यांनी, मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडने अवलंबलेल्या कार्यपद्धतीनुसार, आवश्यक केवायसी कागदपत्रे आणि नोंदणी शुल्क सादर करून, लिलावाच्या तारखेपूर्वीच (https://baanknet.com) या संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करून घ्यावी.

जाहीर ई–लिलावाची तारीख आणि वेळ आहे २५.०९.२०२६ रोजी दु.१०.०० ते सायं.४.०० प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासहीत.

मिळकतीचे तपशील/मिळकत आयडी क्र.	राखीव किंमत (रु. मध्ये)	इसारा अनामत रक्कम (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)
फ्लॅट क्र. ५०६, ५ वा मजला, बिल्डिंग क्र. ०२, जांगीड गॅलेक्सी, सर्व्हे क्र. १९९, हिस्सा क्र. ७, गाव कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे–४००६०७, क्षेत्रफळ ६४.९८ चौ. मीटर, श्री. रमेश एन. अमाडोत आणि श्रीमती सोनल रमेश अमाडोत यांच्या नावे. **मालमत्ता आयडी क्र.:– एसबीआयएन२०००५१५१८४८६**	रु. ८७,३०,०००/–	रु. ८,७३,०००/–	रु. १,००,०००/–
	तारीख :– १०.०९.२०२६ निरीक्षणाची वेळ :– स. ११.०० ते द.२.०० वा.		

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनकोंची वेबसाईट मध्ये दिलेली लिंक बघावी **www.sbi.co.in, https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others** आणि **https://baanknet.com श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, सीएलओ मोबाईल क्र. ७८७५५५१५६६ आणि श्री. अमित एम. साठे, सीओ मोबाईल क्र. ९८३४९३७००१ यांच्याशी संपर्क साधावा.**

चंद्रकुमार डी कांबळे,
प्राधिकृत अधिकारी आणि मुख्य व्यवस्थापक,
स्टेट बँक ऑफ इंडिया
दिनांक : ०५.०९.२०२६
ठिकाण : ठाणे

Bank of India
Relationship beyond banking

स्पेशलाईज्ड ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच
मेझ्झानीन मजला, ७०/८०, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१, **दूर.:** ०२२–२२६७३५४९,
संपर्क क्र.: ९८१९४०३५४९, **ई–मेल :** SARM.MumbaiSouth@bankofindia.bank.in

जंगम/स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता ई–लिलाव

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदी अन्वये स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा कब्जा बँक ऑफ इंडिया, एसएआरएम शाखेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या संबंधित कर्जदारांकडून बँक ऑफ इंडियाच्या संबंधित थकबाकी अधिक तारखेपर्यंत व्याज आणि प्रभाराच्या वसुलीसाठी **२२.०९.२०२६** रोजी ''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने'' विकण्यात येणार आहेत. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम कोष्टकात नमूदनुसार आहे. विक्री ही वेब पोर्टल येथे पुरविलेल्या ई–लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

